# सूक्ष्म नियोजाकांसाठी पाण्याच्या ताळेबंदा करीता मार्गदर्शक पुस्तिका

## शुभदा साळी

## आय.आय.टी, मुंबई

या पुस्तिकेमध्ये गावाचा पाण्याचा ताळेबंद काढण्याच्या प्रक्रियेबाबत खालिल प्रमाणे सूचना दिल्या आहेत. सूक्ष्म नियोजकांनी या सूचनांनुसार आपल्या गावाचा ताळेबंद काढावा.

१. भाग १ - ॲप मध्ये पाण्याच्या ताळेबंद काढण्यासाठी मार्गदर्शक सूचना

२. भाग २ - झोन निहाय माहिती संकलन

३. भाग ३ - परिशिष्ट १ - ॲप मध्ये उपलब्ध जल व मृद संधारण कामे
   परिशिष्ट २ - ॲप मध्ये उपलब्ध पिके आणि जमीन वापर प्रकार

## भाग १ - ॲप मध्ये पाण्याच्या ताळेबंद काढण्यासाठी मार्गदर्शक सूचना

१. Google play store मध्ये जाऊन PoCRA ॲप डाऊनलोड करावी व आपल्या फोन मध्ये इन्स्टाल करावी. त्यानंतर विंडो-१ प्रमाणे ॲप वर क्लिक केल्यानंतर विंडो-२ प्रमाणे स्क्रिन वर दिसेल.



विंडो-१




विंडो-२

२. सर्वप्रथम प्रकल्प व्यवस्थापन कक्षामार्फत देण्यात आलेला आपल्या गावाचा युजर आई-डी आणि पासवर्ड (जन गणना क्र.) भरुन लॉगइन करावे (विंडो - ३).




विंडो-३

३. लॉगइन झाल्यावर विंडो - ४ मध्ये दर्शविल्या प्रमाणे गावाचे नाव व सुक्ष्मनियोजानाचे दिवस( १ ते ६) निवडीसाठी दिसतील.




विंडो - ४

४. गावाचे नाव बरोबर आहे का हे तपासून घ्यावे व तसे नसल्यास प्रथम लॉग आऊट बटन दाबून लॉग आऊट व्हावे व पुनश्च: योग्य युजर आयडी व पासवर्ड (जन गणना क्र.) नमूद करुन लॉग इन करावे.

५. लॉग इन केल्यावर वरील विंडो-४ मध्ये दिसणाऱ्या स्क्रिन वरुन 'Day 3' निवड **(सिलेक्ट)** करावा, 'Day 3' निवड केल्यावर विंडो-५ उघडेल.




विंडो-५


६. विंडो-५ मधील 'प्रपत्र ३.२ पाण्याचे अंदाज पत्रक' यावर क्लिक केल्या नंतर खालीलप्रमाणे विंडो-६ उघडेल.




विंडो-६

७. विंडो-६ मध्ये आपल्या गावामधले सगळे झोन सिलेक्शन साठी दिसतील. उदा. - अखातवाडा गावाचे २ झोन - 'Zone Number is: 1 ', 'Zone Number is: 2 ' निवड करण्या साठी दिसत आहेत. याप्रमाणेच आपल्याला आपल्या गावामधले सर्व झोन विंडो-६ प्रमाणे निवड करण्यासाठी दिसतील.

८. आपल्या गावातल्या झोनवर क्लिक करून निवड करावी व झोन निहाय माहिती ॲप मध्ये भरावी. आखतवाडा मध्ये झोन क्र. १ वर क्लिक केल्यानंतर खालीलप्रमाणे विंडो-७ दिसेल. विंडो ७ मध्ये सिलेक्ट केलेल्या झोन क्र. १ ची झोन निहाय माहिती भरावी.




विंडो-७

९. विंडो-७ मध्ये दिल्याप्रमाणे गावाचा प्रत्येक झोन करीता ३ भागांसाठी माहिती भरावी लागेल.

अ. पाण्याचा ताळेबंद (अस्तित्वातील कामे आणि पिक पद्धती)

ब. प्रस्तावित मृद व जल संधारण कामे

क. प्रस्तावित पिक रचना (हेक्टर)


सर्वप्रथम 'भाग अ - पाण्याचा तालेबंद (अस्तित्वातील कामे आणि पिक पद्धती)' याची माहिती भरावी व नंतर भाग ब आणि भाग क. कडे वळावे.

१०. भाग अ. पाण्याचा ताळेबंद: विंडो-७ मधील पाण्याचा ताळेबंद यावर क्लिक केल्यानंतर खालीलप्रमाणे विंडो-८ उघडेल. त्यामधील **'मृद व जल संधारण कामांमुळे होणारे पुनर्भरण'** यामध्ये आस्तीत्वातील कामांची माहिती भरण्या करिता कामाचा प्रकार यावर क्लिक करावे. त्यानंतर विंडो-९ उघडेल. यामधील कामाचे नाव मधील **Select** वर क्लिक केल्यानंतर मृद व जलसंधारण उपचार/ कामाचे प्रकार याची विंडो-१० प्रमाणे यादी येइल.











विंडो - ८


विंडो-९

विंडो-१०

११. विंडो-१० मधील कामाचा प्रकार यामधील उपचारावर उदा. सलग समतल चर (०.३० मी.) क्लिक केल्यानंतर त्या कामाची / उपचाराची माहिती भरण्यासाठी विंडो-११ उघडेल. विंडो-११ मध्ये हेक्टर व होणारा पाणीसाठा याची माहिती भरावी व Done /√ केलेनंतर जतन (सेव्ह) चे बटन दिसेल (विंडो-१२). SAVE वर क्लिक करुन माहिती जतन (सेव्ह) करावी.

१२. यानंतर ॲप परत मागे विंडो-८ वर जाईल व सुरुवातीला रिकाम्या असणार्या विंडो-८ मधील कामाचा प्रकार याचा वरच्या भागात जतन (सेव्ह) केलेली माहिती विंडो १३ प्रमाणे भरलेली दिसेल. याप्रमाणे अस्तित्वातील मृद व जलसंधारण कामाच्या उर्वरीत सर्व प्रकारांची झोन निहाय माहिती ॲप मध्ये भरुन ‘SAVE’ करावी.







विंडो - ११

विंडो-१२

विंडो-१३

१३. भरलेली माहिती चुकली असल्यास विंडो-१३ प्रमाणे, माहिती पुढे असलेल्या DELETE बटनावर (विंडो-१३ मधले निळे वर्तुळ) क्लिक करून माहिती काढून टाकता येते अथवा ती विंडो-१३ मधेच EDIT करून बदलता येते.

१४. अशा प्रकारे विंडो - ११ ते १३ मध्ये दाखवल्या प्रमाणे, सर्व झोन मधील अस्तित्वातील सर्व कामाची संख्या/हेक्टर व पाणीसाठा - झोन निहाय कामाचा प्रकार (मृद व जल संधारण उपचार) नमूद करुन जतन करावे.

*(मृद व जल संधारण कामांची यादी व प्रत्येक कामासाठी भरावी लागणारी माहिती ही परिशिष्ट - १ मध्ये दिली आहे.)*

१५. आस्तित्वातील सर्व मृद व जलसंधारण कामाची माहिती भरुन पूर्ण केल्यानंतर खालील प्रमाणे (विंडो-१४) दिसेल, याची खात्री करावी.




विंडो - १४


१६. **पिण्याच्या पाण्याची एकूण गरज :** या भागात विंडो - १४ कामाचा प्रकार याखाली पिण्याच्या पाण्याची एकुण गरज यामध्ये (स्क्रोल करुन) त्या झोन मध्ये गावठाण/ वस्त्या असल्यास त्यातील लोकसंख्या, जनावरे, शेळ्या - मेंढ्या आणि कुकुट संख्या यांची माहिती भरावी (विंडो-१५) व Done /√ करावे.





विंडो-१५

१७. **पिके :** विंडो-१५ मध्ये Done /√ वर क्लिक केल्यानंतर खालील पिकाच्या यादी मध्ये झोन मधील पिक पद्धती भरावी. त्यासाठी झोन मध्ये असलेल्या पिकाखालील क्षेत्र हेक्टरमध्ये भरावे. झोन मध्ये जे पिक नाहीत त्यासाठी क्षेत्र भरू नये (ब्लॉंक सोडावे). याचे उदाहरण विंडो - १६ आणि विंडो - १७ मध्ये दिले आहे.

*ॲप मधील पिकांची यादी परिशिष्ट २ मध्ये दिली आहे.




विंडो - १६




विंडो - १७

१८. झोन मधील पिक पद्धत भरताना याकडे लक्ष द्यावे

**सूत्र १.** खरीप क्षेत्र + लांब खरीप क्षेत्र + वार्षिक/बहुवार्षिक क्षेत्र + चालु पड = झोनमधील एकूण शेतीखालील क्षेत्र

**सूत्र २.** बिगरशेती क्षेत्र (गावठाण इ.) + गायरान + वन क्षेत्र + कायम पड = झोनमधील एकूण बिगरशेती क्षेत्र (विंडो -१७ मधील भूमी उपयोगीता वर्गीकरण भरताना याकडे लक्ष द्यावे)

**सूत्र ३.** बिगरशेती क्षेत्र + शेतीखालील क्षेत्र = झोनमधील एकूण क्षेत्र (विंडो -१७ मधील भूमी उपयोगीता वर्गीकरण भरताना याकडे लक्ष द्यावे)

*विंडो-२० मध्ये दाखविल्याप्रमाणे झोन मध्ये पाण्याच्या ताळेबंदाच्या भागात झोनचे एकूण क्षेत्र दिसेल. त्यासाठी पिक पद्धती भरावी.


सूत्र १.मध्ये रबी पिके ही पावसाळ्यानंतर खरीप/ लांब खरीप खालील क्षेत्रावारच लावली जातात असे गृहीत धरले आहे. यामुळे झोनमधील एकूण शेतीखालील क्षेत्र यामध्ये रबी चे क्षेत्र वगळले आहे.

अ. अशा प्रकारे झोनमधील सर्व खरीप, रबी, वार्षिक पिकांखालील क्षेत्र ॲप मध्ये भरावे.


आ. त्याच बरोबर झोन मधील **जमीन प्रकार** निवडून विंडो-१७ प्रमाणे भूमी उपयोगीता वर्गीकरण भागात त्याखालील क्षेत्र पण भरावे. त्यानंतर **जतन(सेव्ह)** बटन दाबून माहिती जतन करावी व **सबमीट** करावी.

इ. **शेतीखालील क्षेत्राची माहिती व भूमिउपयोगिता बाबतची माहिती ही त्या झोनमध्ये असलेल्या एकूण भौगोलिक क्षेत्रापेक्षा कमी / जास्त नसावी. वरील सुत्रां नुसार ही माहिती संकलित करून भरावी.**


ई. शेतीखालील क्षेत्राची माहिती व भूमिउपयोगिता बाबतची माहिती (विंडो १७) (सूत्र ३ चे क्षेत्र) ही त्या झोनमध्ये असलेल्या एकूण भौगोलिक क्षेत्रापेक्षा (विंडो २०) कमी/जास्त असल्यास खालील विंडो १८ आणि विंडो १९ प्रमाणे माहिती दुरुस्त करण्यासाठी संदेश येतील.




विंडो - १८




विंडो-१९




विंडो-२०

उ. विंडो २० मध्ये दाखविल्याप्रमाणे पाण्याचा ताळेबंदाचा भागात सुरुवातीला झोनचे क्षेत्र दिले असेल आणि विंडो १७ मध्ये दाखविल्याप्रमाणे आपण भरलेले शेतीखालील व भूमिउपयोगिता क्षेत्र दिलेले असेल याची तुलना करून पिक पद्धत / जमीन प्रकार याचे क्षेत्र दुरुस्त करावे व विंडो १७ आणि विंडो २० चे क्षेत्र जुळवून घ्यावे.

ऊ. एखादे पिक ॲप मध्ये नसल्यास त्या पिकाशी मिळते जुळते (साधारण सारखा पिकाचा कालावधी व पाण्याची गरज) असलेले ॲप मधील पिक निवडून त्यासाठी क्षेत्राची माहिती भरावी व नसलेल्या पिकाचे नाव प्रकल्प व्यवस्थापन कक्षाला कळवावे.

१९. **सबमीट केलेनंतर पाण्याच्या ताळेबंधाची पीडीएफ प्रकारात फाईल तयार होईल. (विंडो-२२)**

अ. विंडो-२१ मधील पाण्याच्या ताळेबंदाचा अहवाल (रिपोर्ट) पाहण्याकरिता व डाऊन लोड करण्याकरिता गावाचा पाण्याचा ताळेबंद - सध्यस्थिती pdf या वर क्लिक करावे. विंडो-२२ प्रमाणे पाण्याचा ताळेबंद डाऊन लोड झालेला दिसेल.

आ. हा ताळेबंद पाहण्याकरिता गावाचा पाण्याचा ताळेबंद यावर क्लिक करावे. जेणेकरून विंडो - २२ मध्ये दाखवल्याप्रमाणे pdf / word फाइल निवडून पाण्याचा ताळेबंद पाहता येईल.




विंडो-२१




विंडो-२२

२०. झोननिहाय पाण्याचा ताळेबंद खालील प्रमाणे दिसून येईल. (विंडो-२३)

**गावचे नाव : Akhatwada** (Census Code : 530046)

गावचा पाण्याचा ताळेबंद - सद्यस्थितीत

| | Zone 1 | Zone 2 | Total |
|---|---|---|---|
| पावसाळ्यातील संरक्षित सिंचनाची गरज ( | 59 | 0 | 59 |
| पावसाळ्यातील साठवण क्षमतेतून पिकांसाठी उपलब्ध पाणी | 26.98 | 0.00 | 26.98 |
| पावसाळ्यातील पिकांसाठी वापरले जाणारे भूजल | 0 | 0 | 0 |
| ताळेबंद १ : पावसाळ्यातील ताळेबंद : | -32 | 0 | -32 |
| पावसाळ्यातील संरक्षित सिंचन निर्देशांक | 0.45 | 0.0 | 0.45 |
| पावसाळ्यानंतरची पाण्याची गरज | 373 | 0 | 373 |
| पिण्याच्या पाण्याची गरज | 16 | 16 | 16 |
| पावसाळ्या नंतरच्या साठवण क्षमतेतून पिकांसाठी उपलब्ध पाणी | 27 | 0 | 27 |
| पावसाळ्यानंतर पिकांसाठी वापरले जाणारे भूजल | 0 | 0 | 0 |
| मातीतील ओलावा (८-अ) | 103 | 0 | 103 |
| ताळेबंद २: पावसाळ्या नंतरचा ताळेबंद: | -259 | -16 | -276 |
| पावसाळ्यानंतरचा जल वापर निर्देशांक: | 0.33 | 0.00 | 0.45 |
| उपलब्ध अपधाव | 98 | 0 | 98 |
| नियोजनासाठी शिल्लक अपधाव | 44 | 0 | 44 |

**गावातील सरासरी पर्जन्यमान व तक्ता क्र.१ -४ मधील माहितीच्या आधारे शिल्लक अपधाव आणि जमिनीतील उपलब्ध ओलावा (टी.सी.एम)**


| | Zone 1 | Zone 2 | Total |
|---|---|---|---|
| एकूण उपलब्ध अपधाव | 98 | 0 | 98 |
| सध्या अडवलेला अपधाव | 54 | 0 | 54 |
| शिल्लक अपधाव | 44 | 0 | 44 |
| जमिनीतील उपलब्ध ओलावा | 103 | 0 | 103 |
| भूजलाचे पुनर्भरण | 0 | 0 | 0 |

विंडो - २३

२१. हा ताळेबंद 'whatsapp' / 'gmail' वर पाठविण्याकरिता विंडो-२४ मध्ये गावाचा पाण्याचा ताळेबंद - सध्यस्थिती pdf वर क्लिक करावे. विंडो-२५ मध्ये दाखवल्याप्रमाणे ताळेबंद प्रकल्प कार्यालयात / इतरत्र पाठविण्याकरिता पर्याय दिसतील. योग्य पर्याय निवडून ताळेबंद पाठवावा.




विंडो २४




विंडो २५


अशा प्रकारे गावातील सर्व झोन मधील कामांची, पिण्याचा पाण्याची आणि पिक पद्धतीची माहिती भरून पाण्याचा ताळेबंद काढावा व नंतर प्रस्तावित कामाकडे आणि नवीन पिक पद्धती कडे वळावे.

## भाग ब - प्रस्तावित कामे

## प्रस्तावित मृद व जल संधारण कामे

या भागात नवीन कामांचा नियोजनाची माहिती भरावी व नवीन कामे घेतल्यानंतर पाण्याचा ताळेबंदामध्ये होणारा बदल बघावा. त्यानुसार नियोजन बदलावे / ठरवावे. खाली दिलेल्या सूचनां नुसार या भागात माहिती भरावी.


१. प्रस्तावित कामाची माहिती भरण्यासाठी परत झोन मध्ये जावे व भाग ब 'Proposed Structure' मध्ये, भाग अ - पाण्याचा ताळेबंद यामधील सूचना क्र. १० ते १५ मध्ये दिल्या प्रमाणे नवीन जल व मृद संधारण कामांची माहिती भरावी. हे दोन्ही भाग सारखेच आहेत त्यामुळे या सूचना दोन्ही भागांकरिता लागू होतात. याचे उदाहरण विंडो २६, विंडो - २७ आणि विंडो २८ मध्ये दाखविले आहे.




विंडो - २६




विंडो - २७




विंडो - २८


२. झोन ची माहिती भरून पूर्ण झाल्यावार **'सेव्ह'** पर्याय निवडावा. माहिती बरोबर आहे हे पुन्हा एकदा तपासवे व **'सबमिट'** करावे.

३. अशा प्रकारे गावामधील सगळ्या झोन ची प्रस्तावित कामांची माहिती ॲप मध्ये भरून **'सबमिट'** करावी.

४. **'सेव्ह'** केलेली माहिती आपल्या फोन मध्ये राहील. माहिती प्रकल्प (PoCRA) ऑफिस कडे पाठवण्याकरीता ती **'सबमिट'** करावी. माहिती सबमिट करण्याकरिता इंटरनेट ची गरज भासेल. इंटरनेट उपलब्ध (कानेक्टीव्हीटी) झाल्यावर ही माहिती झोन नुसार सबमिट करावी.

# भाग क: प्रस्तावित पिक रचना

१. प्रस्तावित पिक रचनेची माहिती भरण्यासाठी परत झोन मध्ये जावे व भाग क - 'Crop Planning' मध्ये, पिकांची यादी यावर क्लिक करून झोन मधील नवीन पिक पद्धती साठी पिके निवडावी. निवडलेल्या पिकांखालील क्षेत्राची माहिती भरावी. याचे उदाहरण विंडो-२९ आणि विंडो-३० मध्ये दाखविले आहे. ॲप मधील पिकांची यादी परिशिष्ट २ मध्ये दिली आहे.




विंडो-२९




विंडो-३०

२. भाग-अ पाण्याचा ताळेबंद मध्ये सूचना-१७ आणि १८ नुसार पिकाखालील क्षेत्राची माहिती व भूमिउपयोगिता बाबतची माहिती भरावी. ही माहिती संकलित करताना सूक्ष्म नियोजनाचे प्रपत्र २.३ - 'पिकाची माहिती' हि सूची समोर ठेवावी.


३. एखादे पिक ॲप मध्ये नसल्यास त्या पिकाशी मिळते जुळते (साधारण सारखा पिकाचा कालावधी व पाण्याची गरज) असलेले ॲप मधील पिक निवडून त्यासाठी क्षेत्राची माहिती भरावी व नसलेल्या पिकाचे नाव प्रकल्प व्यवस्थापन कक्षाला कळवावे.

४. कडब्या साठी पेरलेल्या पिका खालील क्षेत्र पिक हंगाम नुसार खरिफ चारापिक / रबी चार पिक या मध्ये मोजावे.

५. झोन ची माहिती भरून पूर्ण झाल्यावार **'सेव्ह'** पर्याय निवडावा. माहिती बरोबर आहे हे पुन्हा एकदा तपासवे व **'सबमिट'** करावे.

६. प्रस्तावित कामे आणि प्रस्तावित पिक पद्धत नुसार बदललेला पाण्याचा ताळेबंद सबमिट क्लीक केल्यावर विंडो-३१ प्रमाणे दिसेल. भाग-अ पाण्याचा ताळेबंद मधील सूचना-१९ नुसार

हा डाऊन लोड करावा व पहिल्या ताळेबंदाशी (अस्तित्वातील कामे आणि पिक पद्धत) तुलना करून बघावी. प्रस्तावित कामांमध्ये आणि पिक पद्धती मध्ये योग्य बदल करून फायनल करावा.




विंडो-३१

# भाग २: झोन निहाय माहिती संकलनासाठी सूचना

१. **मृद व जल संधारण कामांमुळे होणारे पुनर्भरण:** ॲप मधील या भागासाठी माहिती **'प्रपत्र २.३' कृषी सहायक यांच्या कडून माहिती प्राप्त करून घ्यावयाचे प्रपत्र '** याचा आधारे भरावी. या प्रपत्रा मध्ये गावातील मृद व जल संधारण कामांचा तपशील भरावयाचा आहे. कृषी सहायका कडून हा तपशील मिळवल्यावर, **झोन निहाय** मृद व जल संधारण कामे याची माहिती **समूह सहायकाने कृषी सहायका समवेत चर्चा करून झोन नकाशावर नमूद करून घ्यावी व प्रपत्र २.३ मध्ये दिल्याप्रमाणे शिवार फेरी दरम्यान निरीक्षण करून व कृषी सहयकाकडून मिळालेल्या माहितीशी तुलना करून / जुळवून ॲप मध्ये भरावी.** जा अस्तित्वातील कामांना दुरुस्तीची गरज आहे, ती दुरुस्ती साठी नकाशावर आणि गाव आराखड्य मध्ये नमूद करावी.

**प्रपत्र २.३ मृद व जल संधारण कामांमुळे होणारे पुनर्भरण** (अस्तित्वातील)

| अ.क्र. | प्रकार | क्षेत्र/संख्या | सद्य:स्थितीबाबत शिवारफेरीत करावयाची निरीक्षणे | शिवार फेरीतील निरीक्षणे |
|---|---|---|---|---|
| १ | सलग समपातळी चर/ कंटूर बंडींग | | सलग समतलपातळी चर/ कंटूर बंडींग/ मजगीसाठी डोंगरउताराचे सुयोग्य क्षेत्र उपलब्ध आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| २ | मजगी (टेरेसींग)/ शेत बांध | | | ☐ होय ☐ नाही |
| ३ | वनीकरण | | वन क्षेत्र/ पडीक जमीन/ गायरान क्षेत्रावर वनीकरणासाठी वाव आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ४ | कुरण विकास | | पडीक जमीन/ गायरान क्षेत्रावर कुरण विकासाकरीता वाव आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ५ | पडीक जमिनीचे समतलीकरण, बांध घालणे, इत्यादी | | पडीक जमिनीचे काही क्षेत्र लागवडी योग्य करण्यास वाव आहे काय? | ☐ होय ☐ नाही |

| अ.क्र. | कामाचा प्रकार | संख्या | सद्य:स्थितीबाबत शिवारफेरीत करावयाची निरीक्षणे | शिवार फेरीतील निरीक्षणे |
|---|---|---|---|---|
| अ) | पूर्ण झालेली कामे | | | |
| १ | माती नाला बांध | | बांधाची माती सारखी करणे, बांधाचे पिचिंग करणे, सांडवा करणे, इत्यादीची गरज आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| २ | सिमेंट नाला बांध | | बांधाला चिरा गेल्या आहेत काय? बांधाची दारे बदलणे, गळती थांबविणे, इत्यादीची गरज आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ३ | वनराई बंधारे | | बंधारा दुरुस्तीची गरज आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ४ | शेत तळे | | तळे/तलावातील गाळ काढणे/ खोल करणे, काठाने वनीकरण करणे, इत्यादीची गरज आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ५ | पाझर तलाव | | | ☐ होय ☐ नाही |

२. **पिण्याचे पाणी:** ही माहिती खालील प्रपत्रांच्या आधारे भरावी

**प्रपत्र १.१ गाव नकाशा सूची व आर्थिक सामाजिक माहितीचे संकलन - भाग ख**

| ख. लोकसंख्या विषयक माहिती | | | | |
|---|---|---|---|---|
| अ क्र. | माहितीचे तपशील | | संख्या | टक्केवारी |
| २१. | लोकसंख्या | स्त्री | | |
| | | पुरुष | | |
| | | एकूण | | |

## प्रपत्र २.४ पशुधनाबाबत आवश्यक माहिती

**प्रपत्र : पशुधनाची उपलब्धता**

| अ.क्र | पशुधनाचा प्रकार | पशुधन असलेल्या कुटुंबाची संख्या | पशुधनापासून उत्पन्न घेणाऱ्या कुटुंबाची संख्या | उत्पन्नाचा कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | हंगामी | वार्षिक |
| १. | गाय / म्हैस | | | | |
| २. | बैल / रेडे | | | | |
| ३. | शेळ्या/ मेंढ्या | | | | |
| ४. | कोंबड्या | | | | |
| ५. | इतर | | | | |

सूचना : सदरील प्रपत्र भरण्याची जबाबदारी पशुसंवर्धन पर्यवेक्षक यांची राहील.

गावठाण / वस्त्या कोणत्या झोन मध्ये आहेत हे गावका-यांसमवेत चर्चा करुन व शिवार फेरी दरम्यानच्या निरीक्षणातून नमूद करून घ्यावी व त्यानुसार ॲप मध्ये गावामधील एका झोन मध्ये पिण्याच्या पाण्याची गरज भरावी.

३. **पिके व जमिन वापर**:
सर्वप्रथम **समूह सहायक** यांनी ग्राम पंचायती/तलाठी / कृषी सहय्यकाकडून **प्रपत्र २.१ जमिनीचे वर्गीकरण व प्रत्यक्ष वापर** याच्या आधारे गावातील जमीन वापर / जमीन प्रकारची खालील माहिती मिळवावी व ती शिवार फेरी दरम्यान निरीक्षण करून झोन निहाय भरावी.

**बिगरशेती प्रकार**

१. वन क्षेत्र - _______ हे.
२. कुरण क्षेत्र - _______ हे.
३. कायम पड क्षेत्र - _______ हे.
४. पोटखराबा क्षेत्र- _______ हे.

**शेती खालील जमीन**

१. लागवाडीखालील एकूण क्षेत्र- _______ हे.
२. चालु पड - _______ हे.

## प्रपत्र २.१ जमिनीचे वर्गीकरण व प्रत्यक्ष वापर

**प्रपत्र : ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण व प्रत्यक्ष वापर**

| अ.क्र. | तलाठ्याकडील नोंदीनुसार जमिनीचे वर्गीकरण | क्षेत्र (हेक्टर) | सद्य:स्थितीबाबत शिवारफेरीत करावयाची निरीक्षणे | शिवार फेरीतील निरीक्षणे |
|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीचे एकूण भौगोलिक क्षेत्र | | ग्रामपंचायतीच्या सीमा निश्चित केलेल्या आहेत काय? | ☐ होय ☐ नाही |
| २ | गावठाण व सार्वजनिक सुविधांखालील क्षेत्र | | गावठाणातील वस्ती गावठाण क्षेत्रापलिकडे पसरली आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | | गावठाण विस्तारासाठी पुरेशी जमीन उपलब्ध आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ३ | वन विभागाच्या ताब्यातील वन क्षेत्र | | वन क्षेत्रात प्रत्यक्ष वन आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| ४ | गायरान/ कुरण क्षेत्र | | प्रत्यक्षात कुरण आहे काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | | कुरणक्षेत्राचा चराईसाठी वापर होतो काय? | ☐ होय ☐ नाही |
| ५ | अकृषिक वापरासाठी क्षेत्र | | अकृषिक वापराचा प्रकार काय? | ☐ होय ☐ नाही |
| ६ | लागवडीस अनुपलब्ध क्षेत्र (नाले, पोट खराब) | | लागवडीस अनुपलब्ध क्षेत्राचा इतर वापर होतो काय? | ☐ होय ☐ नाही |
| ७ | लागवडीस उपलब्ध क्षेत्र | | लागवडीस उपलब्ध सर्व क्षेत्रावर प्रत्यक्ष लागवड होते काय? | ☐ होय ☐ नाही |
| ८ | इतर वापर असल्यास: | | इतर निरीक्षणे: | |

सूचना : शिवार फेरी दरम्यान माहितीची नोंद करतांना सर्व नंबरची नोंद करुन निरिक्षणे नोंदवावीत.
सदरील प्रपत्र भरण्याची जबाबदारी ग्रामसेवकाची राहील.

पिकाची माहिती **'प्रपत्र २.३ कृषी सहायक यांच्या कडून माहिती प्राप्त करून घ्यावयाचे प्रपत्र '** याच्या आधारे संकलित करावी.

## प्रपत्र २.३ पिकाची माहिती

**प्रपत्र : लागवडीखालील जमिनीवर घेतली जाणारी पिके**

| अ.क्र. | पिकाचा हंगाम | सिंचनाची स्थिती | | | | सद्य:स्थितीबाबत शिवारफेरीत करावयाची निरीक्षणे | शिवार फेरीतील निरीक्षणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिरायत | | बागायत | | | |
| | | पिकांची नावे | क्षेत्र (हेक्टर) | पिकांची नावे | क्षेत्र (हेक्टर) | | |
| १ | खरीप | १. | | १. | | खरीप हंगामात लागवडीस उपलब्ध सर्व क्षेत्रात पिके घेण्यात येतात काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | २. | | २. | | पिके घेत नसल्यास कारणे काय? | १.<br>२.<br>३. |
| | | ३. | | ३. | | | |
| २ | रबी | १. | | १. | | रबी पिकाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी काय करता येतील? | १.<br>२.<br>३. |
| | | २. | | २. | | | |
| | | ३. | | ३. | | | |
| ३ | उन्हाळी | १. | | १. | | उन्हाळी पिकाखालील क्षेत्र वाढविण्यासाठी काय करता येतील? | १.<br>२.<br>३. |
| | | २. | | २. | | | |
| | | ३. | | ३. | | | |

सूचना : सदरील प्रपत्र भरण्याची जबाबदारी कृषी सहाय्यक यांची संयुक्तीक राहील.

**प्रपत्र : लागवडीखालील जमिनीवर घेतली जाणारी पिके**

| अ.क्र. | पिकाचा हंगाम | सिंचनाची स्थिती | | | | सद्य:स्थितीबाबत शिवारफेरीत करावयाची निरीक्षणे | शिवार फेरीतील निरीक्षणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जिरायत | | बागायत | | | |
| | | पिकांची नावे | क्षेत्र (हेक्टर) | पिकांची नावे | क्षेत्र (हेक्टर) | | |
| ४ | एक वर्षीय | १. | | १. | | एक वर्षीय पिके ही पारंपारीक पिकांच्या जागी घेण्यात येतात काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | २. | | २. | | असल्यास, पडीक जमीन/ डोंगरउताराचे क्षेत्र अशा पिकांसाठी विकसीत करता येतील काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | ३. | | ३. | | | |
| ५ | बहु वर्षीय | १. | | १. | | बहु वर्षीय पिके ही पारंपारीक पिकांच्या जागी घेण्यात येतात काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | २. | | २. | | असल्यास, पडीक जमीन/ डोंगरउताराचे क्षेत्र अशा पिकांसाठी विकसीत करता येतील काय? | ☐ होय ☐ नाही |
| | | ३. | | ३. | | | |
| पिकांमध्ये फळझाडे, फुलोत्पादन, औषधी वनस्पती, इतर अपारंपारीक पिके यांचाही समावेश करावा. | | | | | | | |

हवामान बदलांमुळे शेतीमध्ये कोणते बदल दिसत आहेत? कोणत्या भागामध्ये ?

अ. वरील प्रपात्रामधून मिळालेल्या गाव निहाय माहितीच्या आधारे **समूह सहायकाने कृषी सहायका समवेत चर्चा करून झोन निहाय पिक पद्धती नमूद करावी / ठरवावी व प्रपत्र २.३ मध्ये दिल्या प्रमाणे शिवार फेरी दरम्यान च्या निरीक्षणानुसार सुधारित करुन ॲप मध्ये भरावी .**

ब. झोन निहाय पिक पद्धती ठरवताना प्रथम झोनचे भौगोलिक क्षेत्र नमूद करून घ्यावे व त्यातील लागवडी खालील आणि बिगरशेती जमिनीचा आढावा घ्यावा. यानंतर लागवडी खालील जमिनीकरिता पिक पद्धती आणि चालु पड ठरवावी.

उदा. -

झोन १ - एकूण क्षेत्र ______ हे., लागवडीखालील क्षेत्र ________हे., बिगर शेत क्षेत्र. ________ हे.

झोन २ - एकूण क्षेत्र_______ हे. , लागवडीखालील क्षेत्र _______हे., बिगर शेत क्षेत्र. _______ हे.

झोन ३ - एकूण क्षेत्र _______ हे., लागवडीखालील क्षेत्र _______हे., बिगर शेत क्षेत्र. ________ हे.

लागवडीखालील क्षेत्र आणि बिगर शेती क्षेत्र याची बेरीज एकूण झोनचा क्षेत्रा एवढी असेल हे बघावे.

४. **प्रस्तावित मृद व जल संधारण कामांमुळे होणारे पुनर्भरण**: ही झोन मध्ये घ्यावयच्या नवीन कामांची माहिती झोन निहाय नकाशांच्या आधारे शिवार फेरी दरम्यान संकलित करून / नकाशांवर नमूद करून घ्यावी व नंतर अॅप मध्ये भरावी.

वरील सर्व माहिती संकलन करण्याकरीता खालील झोन निहाय तक्ते वापरावा.

१. पिकाखालील क्षेत्र (हे.)

| अ.क्र. | पिके | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ | झोन ५ | झोन ६ | झोन ७ | झोन ८ | झोन ९ | एकूण क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भौगोलिक क्षेत्र | | | | | | | | | | |
| | खरीप पिके | | | | | | | | | | |
| १ | बाजरी | | | | | | | | | | |
| २ | ख. ज्वारी | | | | | | | | | | |
| ३ | मका | | | | | | | | | | |
| 4 | मुग | | | | | | | | | | |
| 5 | उडीद | | | | | | | | | | |
| 6 | सोयबिन | | | | | | | | | | |
| 7 | इतर खरीप पिके | | | | | | | | | | |
| दीर्घ कालीन खरीप पिके | | | | | | | | | | | |
| १ | तूर | | | | | | | | | | |
| २ | कापूस | | | | | | | | | | |
| | रबी पिके | | | | | | | | | | |
| १ | र. ज्वारी | | | | | | | | | | |
| २ | गहू | | | | | | | | | | |
| ३ | हरभरा | | | | | | | | | | |
| ४ | इतर रबी पिके | | | | | | | | | | |
| | उन्हाळी पिके | | | | | | | | | | |
| १ | भूईमुग | | | | | | | | | | |
| २ | इतर उन्हाळी पिके | | | | | | | | | | |
| भाजीपाला पिके | | | | | | | | | | | |
| | वार्षिक पिके | | | | | | | | | | |
| १ | केळी | | | | | | | | | | |
| २ | पपई | | | | | | | | | | |
| ३ | ऊस | | | | | | | | | | |
| | बहुवार्षिक पिके(फळपिके) | | | | | | | | | | |
| १ | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | |
| | एकूण क्षेत्र (हे.) | | | | | | | | | | |

**२. पेरणी क्षेत्रा व्यतिरिक्त क्षेत्र**

| अ.क्र. | प्रकार | एकूण क्षेत्र (हे.) |
|---|---|---|
| १ | वनक्षेत्र | |
| २ | बिगर शेती | |
| ३ | पोटखराबा | |
| ४ | गायरान | |
| ५ | कायम पड (गावठाणसह) | |
| ६ | चालू पड | |
| | **एकूण** | |

**३. अस्तित्वातील मृद व जल संधारण कामे**

| अ. क्र. | कामाचा प्रकार व बाबी | परिमाण | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ | झोन ५ | झोन 6 | झोन ७ | झोन ८ | झोन ९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **I** | **क्षेत्र उपचार** | | | | | | | | | | | |
| अ | **वनक्षेत्र** | | | | | | | | | | | |
| १ | सलग समतल चर (०.३० मीटर) | हेक्टर | | | | | | | | | | |
| २ | सलग समतल चर(०.45 मीटर) | हेक्टर | | | | | | | | | | |
| ३ | खोल सलग समपातळी चर | हेक्टर | | | | | | | | | | |
| ४ | मजगी /पडकई | हेक्टर | | | | | | | | | | |
| ब | **इतर क्षेत्र** | | | | | | | | | | | |
| १ | सलग समतल चर (०.३० मीटर) | हेक्टर | | | | | | | | | | |
| २ | सलग समतल चर (०.45 मीटर) | हेक्टर | | | | | | | | | | |
| ३ | खोल सलग समपातळी चर | हेक्टर | | | | | | | | | | |
| ४ | मजगी /पडकई | हेक्टर | | | | | | | | | | |
| II | **ओघळीवरचे उपचार** | | | | | | | | | | | |
| अ | **वनक्षेत्र** | | | | | | | | | | | |
| १ | अनगड दगडाचे बांध | संख्या | | | | | | | | | | |
| २ | गॅबियन बंधारा | संख्या | | | | | | | | | | |
| ३ | माती नाला बांध | संख्या | | | | | | | | | | |
| ४ | सिमेंट नाला बांध | संख्या | | | | | | | | | | |
| ब | **इतर क्षेत्र** | | | | | | | | | | | |
| १ | अनगड दगडाचे बांध | संख्या | | | | | | | | | | |
| २ | गॅबियन बंधारा | संख्या | | | | | | | | | | |
| ३ | माती नाला बांध | संख्या | | | | | | | | | | |
| ४ | सिमेंट नाला बांध | संख्या | | | | | | | | | | |
| ५ | कोल्हापूर बंधारा | संख्या | | | | | | | | | | |
| 6 | नाला खोलीकरण (लांबी * रुंदी * खोली) | टी.सी.एम | | | | | | | | | | |
| **III** | **पाणी साठवण संरचना** | | | | | | | | | | | |
| १ | सामुदायिक शेततळे - अस्तरी करणासह (१००X१००X३ मी) | संख्या | | | | | | | | | | |
| २ | सामुदायिक शेततळे - अस्तरी करणा शिवाय (१००X१००X३ मी) | संख्या | | | | | | | | | | |
| ३ | शेततळे - अस्तरीकरणासह (३० X ३० X ३ मी ) (याव्यतिरिक्त आकारमान वेगळे असल्यास नमुद करावे) | संख्या | | | | | | | | | | |
| ४ | शेततळे - अस्तरीकरणा शिवाय (३० X ३० X ३ मी ) (याव्यतिरिक्त आकारमान वेगळे असल्यास नमुद करावे) | संख्या | | | | | | | | | | |
| ५ | शेततळे - इनलेट व आउटलेट्सह | संख्या | | | | | | | | | | |
| ६ | वैयक्तिक विहिरी | संख्या | | | | | | | | | | |

| अ.क्र. | कामाचा प्रकार व बाबी | परिमाण | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ | झोन ५ | झोन 6 | झोन ७ | झोन ८ | झोन ९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | गाव तलाव | संख्या | | | | | | | | | | |
| ८ | पाझर तलाव | संख्या | | | | | | | | | | |
| **IV** | **मुलस्थानी जलसंधारण** | | | | | | | | | | | |
| १ | शेत बांध बंदिस्ती | हेक्टर | | | | | | | | | | |
| २ | ढाळीचे बांधबंदिस्ती | हेक्टर | | | | | | | | | | |
| | **एकूण** | | | | | | | | | | | |

**४. पिण्याच्या पाण्याची एकुण गरज**

| अ.क्र. | बाब | संख्या |
|---|---|---|
| १ | लोकसंख्या | |
| २ | मोठी जनावरे (गाय, म्हैस, बैल, इ.) | |
| ३ | लहान जनावरे (शेळ्या, मेंढ्या, इ.) | |
| ४ | कोंबड्या | |

## भाग ३

## परिशिष्ट १ - मृद व जल संधारण कामांची उपचार यादी

| क्र. | कामाचे नाव | मोजमाप/परिमाण | सरासरी उपलब्ध साठवण क्षमता (टी. सी. एम) |
|---|---|---|---|
| | १ | २ | ३ |
| | | | Edit |
| १. | मजगी/पकडई | हेक्टर | १.४१ |
| २. | सलग समतल चर (०.३ मीटर) | हेक्टर | ०.४५ |
| ३. | सलग समतल चर (०.४५ मीटर) | हेक्टर | ०.४५ |
| ४. | खोल सलग समपातळी चर (DCCT) - शिवार | हेक्टर | ०.४५ |
| ५. | खोल सलग समपातळी चर (DCCT) -वनक्षेत्र | हेक्टर | ०.४५ |
| ६. | ढाळीचे बांध | हेक्टर | ०.४५ |
| ७. | शेत बांध बंदिस्ती / कमपार्टमेंट बंडिंग | हेक्टर | ०.४५ |
| ८. | लुज बोल्डर (लु. बो.) | संख्या | ०.१ |
| ९. | गेबिअन बंधारा | संख्या | ०.२ |
| १०. | अर्थन बंधारा/माती नाला बांध | संख्या | ५ |
| ११. | सिमेंट नाला बांध | संख्या | ६ |
| १२. | के. टी. वेर/कोल्हापूर बंधारा | संख्या | ३० |
| १३. | नाला खोलीकरण रुंदीकरण | लांबी x रुंदी x खोली | |
| १४. | शेततळे - अस्तरीकारणा सह (३० x ३० x ३) | संख्या | २.२ |
| १५. | शेततळे - अस्तरीकारणा शिवाय (३० x ३० x ३) | संख्या | २.२ |
| १६. | शेततळे - इनलेट आउटलेट सह (३० x ३० x ३) | संख्या | २.२ |
| १७. | सामुदाइक शेत तळे - अस्तरीकारणा सह (१००x १००x ३) | संख्या | २५ |
| १८. | सामुदाइक शेत तळे- अस्तरीकारणा शिवाय (१००x १००x ३) | संख्या | २५ |
| १९. | गाव तलाव | संख्या | २५ |
| २०. | पाझर तलाव | संख्या | १० |
| २१. | वैयक्तिक विहिरी | संख्या | |
| २२. | बोरवेल | संख्या | |

## परिशिष्ट २ - पिकांची यादी

| पिक हंगाम | पिकाचे नाव | पिकाची पाण्याची गरज (मी.मी.) | पिकाचा कालावधी (दिवस) |
|---|---|---|---|
| खरीप | खरीप ज्वारी | ४२५ | १२० |
| खरीप | बाजरी | ३११ | ९० |
| खरीप | मुग | २७४ | ६० |
| खरीप | उडीद | २७४ | ८३ |
| खरीप | सोयाबीन | ३७५ | १०५ |
| खरीप | खरीप मका | ४७५ | ९० |
| खरीप | खरीप भुईमुग | ४७४ | १२० |
| खरीप | खरीप सुर्यफुल | ४०० | १०५ |
| खरीप | खरीप चार पिके | २९९ | ९० |
| खरीप | खरीप कांदा | ५२६ | ११५ |
| खरीप | खरीप मिरची | ८७५ | १९० |
| खरीप | खरीप वांगी | ८२४ | १९० |
| खरीप | खरीप टोमेटो | ६९८ | १३७ |
| खरीप | खरीप फुल कोबी | ४७४ | ८५ |
| खरीप | खरीप भाजीपाला | ५०० | ११० |
| खरीप | कमी कालावधीचा भाजीपाला | ३०० | ६० |
| लांब खरीप | तूर | ६२५ | १६५ |
| लांब खरीप | हळद | १२५० | २४० |
| लांब खरीप | बटाटा | ५५० | १०५ |
| लांब खरीप | कापूस | ८०२ | १८० |
| वार्षिक | द्राक्ष | १७५६ | ३६५ |
| वार्षिक | केळी | २०५१ | ३६५ |
| वार्षिक | डाळिंब | १२९२ | ३६५ |

| | | | |
|---|---|---|---|
| वार्षिक | संत्रा | १४९० | ३६५ |
| वार्षिक | मोसंबी | १४९० | ३६५ |
| वार्षिक | लिंबू | १४९० | ३६५ |
| वार्षिक | ऊस | २१३० | ३६५ |
| रबी | रबी ज्वारी | ४२५ | १३५ |
| रबी | रबी हरभरा | ३५० | १०५ |
| रबी | रबी गहू | ५२५ | १२० |
| रबी | रबी मका | ५०० | ९० |
| रबी | रबी कांदा | ६२५ | ११५ |
| रबी | रबी मिरची | ११०० | १९० |
| रबी | रबी टोमेटो | ७०० | १३७ |
| रबी | रबी वांगी | १००० | १९० |
| रबी | रबी भाजीपाला | ६०० | ६० |
| रबी | रबी फुल कोबी | ४७५ | ६२५ |
| रबी | रबी बटाटा | ५५० | १०५ |
| रबी | रबी भेंडी | ४७५ | ११२ |
| रबी | रबी भुईमुग | ६५० | १२० |
| रबी | रबी सुर्यफुल | ४२५ | १०५ |
| रबी | रबी चार पिके | ३५० | ९० |
| **जमीन वापर** | | | |
| जमीन वापर | वन क्षेत्र | ८०० | ३६५ |
| जमीन वापर | पोटखराबा | ३०० | ३६५ |
| जमीन वापर | गायरान | ४०० | ३६५ |
| जमीन वापर | कायम पड (गावठाण सह) | १५० | १२२ |
| जमीन वापर | चालु पड | १५० | १२२ |

- **वरील पिकाची माहिती WALMI संस्थे ने प्रकाशित केलेल्या पुस्तिके नुसार आहे.**